एसजीपीडीए मार्केटमध्ये कचऱ्याचा गंभीर प्रश्न कायम पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

२०२६च्या आशियाई स्पर्धेत क्रिकेटचा समावेश पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, १ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 238 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 1 May 2025 | Pages 4 | ₹ 4

निवडक

हिंदू संत चिन्मय दास यांना जामीन मंजूर

ढाका, दि. ३० : बांगलादेशच्या ढाका उच्च न्यायालयाने बुधवारी तुरुंगात असलेले हिंदू संत चिन्मय कृष्ण दास यांना जामीन मंजूर केला. चिन्मय दास गेल्या ५ महिन्यांपासून देशद्रोहाच्या आरोपाखाली तुरुंगात आहेत. चिन्मय यांचे वकील अपूर्व कुमार भट्टाचार्य यांनी २३ एप्रिल रोजी उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. बांगलादेशी वृत्तपत्र द डेली स्टारने चिन्मय दास यांच्या वकिलाचा हवाला देत म्हटले आहे की, चिन्मय यांच्या सुटकेचा अद्याप निर्णय झालेला नाही. जर बांगलादेशी सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिली नाही, तर चिन्मय यांची सुटका होईल. चिन्मय यांच्यावर बांगलादेशच्या राष्ट्रध्वजाचा अपमान केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात, देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आणि २५ नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांना अटक करण्यात आली. यापूर्वी २ जानेवारी रोजी, चितगाव येथील कनिष्ठ न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला होता.

भारत-पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला

श्रीनगर, दि. ३० : पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिन्ही सैन्य दलांच्या प्रमुखांची बैठक घेतली. त्यांना कारवाईसाठी पूर्ण मुभा दिली. त्यानंतर आता पाकिस्तानचे धाबे दणाणले आहेत. भारताला धडा शिकवण्याची भाषा पाकिस्तान सरकारमधील मंत्री करत असले, तरी सीमेवरील परिस्थिती त्याच्या अगदी उलट आहे.दोन्ही देशांच्या आंतरराष्ट्रीय सीमेवरील काही चौक्यांवरुन पाकिस्तानी सैनिक मागे हटले आहेत. पाकिस्तानच्या चौक्यांवरुन झेंडेही उतरवण्यात आले आहेत. आंतरराष्ट्रीय सीमेवरील अनेक चौक्या पाकिस्तानी सैनिकांनी रिकाम्या केल्या आहेत. पाकिस्तानच्या कठुआच्या पर्गवालमधील चौक्यांमध्ये सध्या सैनिक नाहीत. पहलगाम हल्ल्यापासून जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर तणाव वाढला आहे. पाकिस्तानी सैनिकांनी अनेकदा शस्त्रसंधीचं उल्लंघन करत गोळीबार केला आहे.

बिश्नोई गँगची पाकिस्तानला धमकी

नवी दिल्ली, दि. ३० : पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट आहे. पहलगाम हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचे पुरावे समोर आले आहेत. त्यामुळे पाकिस्तानला धडा शिकवण्याची मागणी जोर धरु लागली आहे. यानंतर आता कुख्यात लॉरेन्स बिश्नोई टोळीनं पहलगाममधील हल्ल्याचा बदला घेण्याची धमकी दिली आहे. या गँगनं दिलेल्या धमकीशी संबंधित सोशल मिडिया पोस्ट व्हायरल होत आहे. पहलगाममध्ये मारल्या गेलेल्या निर्दोष लोकांच्या हत्येच्या प्रत्युत्तरात आम्ही पाकिस्तानात घुसून अशा एका व्यक्तीला मारु, जो एक लाखाच्या बरोबर आहे, अशी धमकी लॉरेन्स बिश्नोई गँगकडून देण्यात आली आहे. बिश्नोई गँगच्या पोस्टमध्ये लष्कर-ए-तोयबा संघटनेचा म्होरक्या हाफिज सईदचा फोटोदेखील आहे. त्या फोटोवर फुली मारण्यात आलेली आहे. बिश्नोई गँगची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे.

हाट मार्केटला आग; ३० दुकाने जळून खाक

दिल्ली, दि. ३० : दिल्लीतील किडवाई नगर भागात असलेल्या दिल्ली हाट मार्केटमध्ये बुधवारी संध्याकाळी भीषण आग लागली. रात्री ८.५५ वाजता अग्निशमन दलाला कळवण्यात आले, त्यानंतर १३ अग्निशमन गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. आगीत अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. पण सुमारे २५ ते ३० दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली. हे बाजार भारतातील ग्रामीण बाजारपेठांपासून प्रेरित आहे आणि देशभरातील हस्तकला विकणारे स्टॉल्स आहेत. दिल्ली हाट हे एक लोकप्रिय कला आणि हस्तकला बाजार आहे आणि त्यात एक फूड प्लाझा देखील आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, वेगवेगळ्या राज्यांमधील स्टॉल्समध्ये आग लागली. घटनेची सविस्तर माहिती अद्याप समजू शकलेली नाही.

देशात जातनिहाय जनगणना होणार; केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय

नवी दिल्ली, दि. ३० :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या राजकीय बाबींवरील मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला असून, देशात होणाऱ्या पुढील जनगणनेमध्ये जातींची नोंद घेण्यात येणार आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती देताना स्पष्ट केले की, सरकारने जनगणनेत जातीवर आधारित माहिती गोळा करण्याचा निर्णय घेतला आहे.

राजकीय बाबींवरील कॅबिनेट समितीत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, अर्थमंत्री निर्मला सीतारामण, रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांचाही समावेश आहे.

हा निर्णय जाहीर होताच देशभरात विविध प्रतिक्रिया उमटल्या. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी याचे स्वागत करत म्हटले की, या निर्णयामुळे विविध जातींची लोकसंख्या स्पष्ट होईल आणि त्यानुसार धोरण आखणे सुलभ होईल. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांनी हा निर्णय भारतीय लोकशाहीस बळकटी देणारा आणि राजकीय वास्तवाशी जोडलेला असल्याचे मत व्यक्त केले.

राजकीय विश्लेषक योगेंद्र यादव यांनी या निर्णयाचे स्वागत करत म्हटले की, या मागणीसाठी आम्ही दशकांपासून प्रयत्नशील होतो. आता पंतप्रधान मोदी यांना या निर्णयाबद्दल अभिनंदन देतानाच, खऱ्या अर्थाने संघर्ष करणाऱ्यांचेही कौतुक व्हायला हवे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी हा निर्णय केंद्रावरच्या दबावामुळे घेतल्याचा आरोप केला. त्यांनी सांगितले की, जातीनिहाय जनगणना होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे आम्ही आधीच सांगितले होते. आता मोदी सरकारने ही घोषणा केली आहे, तरीही आम्हाला अंमलबजावणीची ठोस तारीख हवी आहे. काँग्रेस प्रवक्ते जयराम रमेश यांनी देखील या निर्णयाचा संदर्भ देत काँग्रेसच्या अलिकडील ठरावाची आठवण करून दिली आणि म्हटले, उशीर झाला तरी निर्णय स्वागतार्ह आहे.

आरजेडी नेते तेजस्वी यादव यांनी या निर्णयामागे विरोधकांचा विजय असल्याचा दावा केला. पूर्वी मोदी सरकारने या मागणीला नकार दिला होता, आता आमच्या अजेंडावर चालत आहे. ही आमची मागणी होती आणि आज त्याची कबुली मिळाली आहे, असे त्यांनी म्हटले.

समाजवादी पक्षाचे फखरुल हसन यांनी भाजपवर अविश्वास व्यक्त करत, ते जे म्हणतात आणि जे करतात त्यात मोठा फरक असतो. आम्ही संपूर्ण जनगणना प्रक्रियेवर नजर ठेवणार आहोत,असे स्पष्ट केले.

या निर्णयाचे राजकीय संदर्भ लक्षात घेता, पत्रकार रशीद किडवाई आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचे माजी प्राध्यापक पुष्पेंद्र कुमार यांनी यामागील संभाव्य राजकीय हेतूंवर प्रकाश टाकला आहे. किडवाई म्हणतात की, सरकारने विरोधकांकडून हा मुद्दा काढून घेतला आहे, मात्र त्यानंतर मिळालेल्या माहितीचा वापर कसा केला जाणार हे अद्याप स्पष्ट नाही.त्यांनी हे देखील सूचित केले की, बिहार निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रा. पुष्पेंद्र कुमार यांच्या मते, भाजप केवळ उच्चवर्णीय मतांवर निवडणुका जिंकू शकत नाही. त्यांना इतर मागासवर्गीय आणि दलित समाजाचे समर्थन मिळवायचे असल्याने हा निर्णय घेण्यात आला असावा. २०११ नंतर देशात जातीनिहाय जनगणना झालेली नाही. बिहारमध्ये २०२२ मध्ये झालेल्या जात सर्वेक्षणात अनेक त्रुटी आढळल्या होत्या आणि भाजप नेत्यांनी त्यावर टीका केली होती. मात्र त्या वेळी भाजप देखील नितीश कुमार सरकारमध्ये सहभागी होता.

या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारचा हा निर्णय विरोधकांकडून सातत्याने करण्यात आलेल्या मागणीमुळे घेतल्याचे दिसते. 'इंडिया आघाडी'सह काँग्रेस, आरजेडी आणि इतर प्रादेशिक पक्षांनी देशभरात जातीनिहाय जनगणनेची जोरदार मागणी केली होती.

जातीनिहाय जनगणनेचा मुख्य उद्देश म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणात शिक्षण, रोजगार आणि सत्तेत समान प्रतिनिधित्व मिळावा ही मागणी आहे. तथापि, सरकारने केवळ गणना जाहीर केली असून, त्यानंतरच्या धोरणात्मक टप्प्यांबाबत अद्याप काही घोषणा केलेली नाही.

एसटी समाजातील पोसिसांना पदोन्नती योजना लागू होणार

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३० : गोवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगाने राज्य सरकारला शिफारस केली आहे की, गोवा पोलिस विभागातील अनुसूचित जमाती (एसटी) समाजातील ५० सहाय्यक उपनिरीक्षक कर्मचाऱ्यांना दुसरी सुधारित खात्रीशीर करिअर प्रगती योजना लागू करण्यात यावी.

ही शिफारस अखिल भारतीय आदिवासी कर्मचारी महासंघ, गोवा शाखेने सादर केलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली आहे. महासंघाने आयोगाकडे तक्रार नोंदवली होती की, संबंधित एसटी कर्मचारी २० वर्षांची सेवा पूर्ण करूनही दुसऱ्या आर्थिक उन्नतीपासून वंचित ठेवले गेले आहेत.

महासंघाच्या म्हणण्यानुसार, या ५० कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभांशाशिवायच एएसआय पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. यापूर्वी, सेवा कालावधीच्या १० व्या वर्षी त्यांना पहिली मॅकपीएस मिळालेली होती. त्यानंतर, आरक्षण धोरणाअंतर्गत त्यांना एएसआय पदोन्नती मिळाली. मात्र, दुसऱ्यामॅकपीएस साठी आवश्यक २० वर्षांची नियमित सेवा पूर्ण करूनही, त्यांना दुसरी आर्थिक पदोन्नती नाकारण्यात आली, हे मूलभूत अधिकाराचे उल्लंघन असल्याचा आरोप ॲड. उपासो गांवकर यांनी आयोगासमोर केला.

यावर प्रत्युत्तर देताना, डीजीपी व गृह विभागाचे अवर सचिव यांचे प्रतिनिधित्व करणारे ॲड. के. एल. भगत यांनी स्पष्ट केले की, विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांनुसार, कर्मचाऱ्यांना १०, २० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतर मॅकपीएस लाभ मिळतो. मात्र, ज्यांना १० वर्षांच्या आत दोन पदोन्नती मिळाल्या आहेत, त्यांना दुसरी मॅकपीएस मिळण्याची अट लागू होत नाही.

तथापि, आयोगाचे अध्यक्ष दीपक करमळकर यांनी यामध्ये हस्तक्षेप करत, आर्थिक लाभांशाशिवाय पदोन्नती मिळालेल्या या ५० एसटी कर्मचाऱ्यांना दुसरी मॅकपीएस योजना लागू करण्याचे आदेश दिले आहेत. ही अंमलबजावणी ६० दिवसांच्या आत पूर्ण करण्यात यावी, असे त्यांनी स्पष्टपणे सूचित केले.

नालेसफाई पूर्ण केल्याचा महानगरपालिकेचा दावा

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३० : महानगरपालिकेने शहरातील नाले आणि पृष्ठभागावरील जलवाहिन्यांची स्वच्छता पूर्ण केली असल्याची माहिती महापालिका आयुक्त क्लेन मदेरा यांनी बुधवारी दिली. ३० एप्रिलपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, खाड्या आणि प्रमुख नालयांच्या स्वच्छतेसाठी जलसंपदा विभागाशी समन्वय साधण्यात आला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मदेरा यांनी सांगितले की, ही नालेसफाई स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या कोणत्याही कामात अडथळा न होता पार पडली. गाळ काढणे ही महापालिकेची जबाबदारी होती आणि ती पूर्ण करण्यात आली आहे. महानगरपालिका आपले काम करत आहे. या कामासाठी अंदाजे ४० लाख रुपये खर्च झाले असून, हे काम बाह्य संस्थेच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आले आहे, असे ते म्हणाले.

दरवर्षी पावसाळ्यात शहरात निर्माण होणाऱ्या पाणीसाच्याबाबत विचारले असता, त्यांनी याला पूर न म्हणता 'पाणी साचणे' असे संबोधले. यावर्षी अशी परिस्थिती टाळता येईल का, यावर उत्तर देताना त्यांनी सांगितले की, नालेसफाई करुन नाले खाड्यांपर्यंत नेण्यात येतील. खाड्यांतील गाळ काढण्याचे काम जलसंपदा विभागाकडे सुपूर्द केले आहे, तर नद्यांबाबतची जबाबदारी बंदरांच्या कॅप्टनकडे आहे

महानगरपालिका अभियंता व्यंकटेश सावंत यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ३० पैकी २८ प्रभागांतील नालेसफाई पूर्ण झाली आहे, तर उर्वरित दोन प्रभागांतील काम सुरू आहे. हे काम १ मेपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. यामध्ये गटारांची स्वच्छता आणि झाडांची छाटणीही समाविष्ट आहे. संपूर्ण प्रकल्प ३१ मेपूर्वी पूर्ण होण्याचे उद्दिष्ट आहे.

सावंत यांनी यावेळी स्पष्ट केले की, शहरातील मुख्य नाल्यांची जबाबदारी जलसंपदा विभागाकडे आहे आणि त्यांच्या कामाला १ मेपासून सुरुवात होण्याची शक्यता आहे. हे काम पूर्ण होण्यासाठी साधारणतः एक महिना लागतो. प्रभागांमध्ये कोणती कामे करावीत यासाठी स्थानिक नगरसेवकांशी चर्चा करूनच काम राबवले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्येवर भाष्य करताना त्यांनी भरती-ओहोटी आणि जोरदार पावसाला कारणीभूत ठरवले. भरतीच्या वेळी पाण्याचा प्रवाह अडवला जातो. मात्र यावर्षी ही परिस्थिती सुधारेल, अशी आशा आहे, असे सावंत यांनी सांगितले.

भटक्या कुत्र्यांना सांभाळणाऱ्यांची अवस्था बिकट

टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. ३० : शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत असून त्यांनी नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण केलं आहे. १९ एप्रिलला गर्भाट येथे १.५ वर्षांच्या बालिकेचा भटक्या कुत्र्यांनी बळी घेतल्यानंतर या प्रश्नाचं गांभीर्य अत्यंत वाढलं आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण गोव्यात संतापाची लाट उसळली होती. मात्र यानंतरही सरकारकडून किंवा संबंधीत स्थानीक पंचायतींकडून कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही .

उपजिल्हा रुग्णालय, फोंडा यांनी दिलेल्या माहितीनुसार, दरमहा सरासरी ८० ते ९० कुत्रे चावण्याच्या घटनांची नोंद घेतली जाते. त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा प्रश्न अधिक गंभीर बनत चालला आहे. पादचाऱ्यांवर हल्ले, दुचाकीस्वारांचा अपघात, आणि लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांसाठी वाढता धोका यामुळे फोंड्यातील नागरी जीवन विस्कळीत होत आहे. अनेक वेळा रस्त्यांवर अचानक उगम पावणाऱ्या कुत्र्यांमुळे अपघातांच्या घटनाही समोर आल्या आहेत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर कुर्टी फोंडा येथील 'पीपल फॉर ॲनिमल्स' या संस्थेच्या संचालिका सरिता परब यांनी सांगितले की, भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी आवश्यक असलेल्या नसबंदी मोहिमा पंचायतांकडून मिळणाऱ्या अपुऱ्या सहकार्यामुळे अडचणीत सापडल्या आहेत. फोंडा तालुक्यात एकूण १९ ग्रामपंचायती असताना फक्त ७ पंचायतांनीच संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे.

आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून सेवाभावाने आणि अत्यल्प मानधनावर काम करत आहोत. कुत्र्यांची संख्या नियंत्रित ठेवण्यासाठी नियमित नसबंदी मोहिम राबवणे अत्यावश्यक आहे. मात्र स्थानिक संस्थांचा अल्पकालीन सहभाग आणि करार न झाल्यास आमचे प्रयत्न व्यर्थ जातात, असेही परब यांनी स्पष्ट केले.

पीएफए संस्थेने २०२४ मध्ये आतापर्यंत ५४० भटक्या कुत्र्यांची नसबंदी केली असून, १,३३३ कुत्र्यांना रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले आहे. याशिवाय २५० प्राण्यांना वाचवण्याच्या मोहिमा राबवण्यात आल्या आहेत. परब यांनी असेही सांगितले की, बहुतेक पंचायती २०१४ च्या भटक्या कुत्र्यांच्या व्यवस्थापन योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी प्रयत्न करत नाहीत. जर या योजनेंतर्गत अर्ज केले, तर आवश्यक निधी सहज उपलब्ध होऊ शकतो.

नसबंदी मोहिमा नियमितपणे राबवण्यासाठी संस्था पशुवैद्यकीय डॉक्टरांवर, त्यांच्या मानधनावर, तसेच कुत्र्यांच्या ने-आणीसाठी लागणाऱ्या पिंजऱ्यांवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून आहे. या सगळ्याचा खर्च भागवण्यासाठी पशुसंवर्धन खात्याची मदत आवश्यक आहे, असंही परब यांनी स्पष्ट केले. त्यांनी स्थानिक नागरिकांनाही सहकार्याचं आवाहन केलं आहे. काही नागरिक त्यांच्या पाळीव कुत्र्यांना नसबंदी केंद्रात पाठवण्यास नकार देतात. त्यांच्या सहकार्याविना या समस्या सोडवता येणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला.

जातीय जनगणनेच्या घोषणेबाबत विरोधी पक्षांनी सुचवल्या सुधारणा

नवी दिल्ली, दि. ३० :

केंद्र सरकारने आगामी राष्ट्री जनगणनेच्या दरम्यान देशात जातीनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला असून, यावरून देशभरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. या निर्णयाचे विरोधी पक्षांकडून स्वागत तसेच टीकाही होत आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मंगळवारी आयोजित पत्रकार परिषदेत केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करताना त्याला देशाच्या सामाजिक न्यायासाठी एक महत्त्वाचे पाऊल असे संबोधले. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, आम्ही संसदेच्या पातळीवर ठाम भूमिका घेतली होती की जातीनिहाय जनगणना होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. त्याचप्रमाणे, आरक्षणाच्या ५०% मर्यादेच्या भिंतीलाही आम्ही आव्हान देऊ.

राहुल गांधी यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींवरही टोला लगावत म्हटले, मोदी पूर्वी म्हणायचे की देशात फक्त चार जाती आहेत, पण आता त्यांनी जातीय जनगणनेची घोषणा केली आहे. आम्ही या निर्णयाचे पूर्ण समर्थन करतो, परंतु सरकारने जनगणना कधी पूर्ण होणार याबाबत वेळापत्रक द्यायला हवे.

तेलंगणा आणि बिहार राज्यांतील जातीय जनगणनेच्या मॉडेलचा उल्लेख करत राहुल गांधी म्हणाले की, तेलंगणा हे मॉडेल देशासाठी एक ब्लूप्रिंट बनू शकते. आम्ही सरकारला या रचनेच्या आखणीत मदत करू, कारण ही प्रक्रिया देशाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे.

राहुल गांधी पुढे म्हणाले, ओबीसी, दलित आणि आदिवासी समाजाचा खरा सहभाग देशाच्या संस्थात्मक आणि प्रशासकीय रचनेत किती आहे, हे समजण्यासाठी जातीय जनगणना आवश्यक आहे. फक्त लोकसंख्या नव्हे, तर त्यांच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्नही केंद्रस्थानी यायला हवा. तसेच काँग्रेस पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यातील मुद्द्याला उजाळा देत त्यांनी स्पष्ट केले की, कलम १५(५) अंतर्गत खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण लागू केले जावे, अशी आमची मागणी आहे आणि सरकारने ते त्वरित अमलात आणावे. दरम्यान, राजकीय रणनीतीकार आणि जन सुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी अधिक वास्तववादी दृष्टीकोन मांडताना म्हटले की, कोणत्याही माहितीपूर्ण जनगणनेत अडचण नाही, पण बिहारच्या जातीय जनगणनेतून हे स्पष्ट झाले की, केवळ आकडेवारी गोळा करून बदल होत नाही. सरकारने त्या निष्कर्षांवर काम केल्याशिवाय समाजात खऱ्या सुधारणा शक्य नाहीत.

किशोर यांनी उदाहरण देत सांगितले की, बिहारच्या जनगणनेत ९४ लाख कुटुंबे गरीब असल्याचे नमूद करण्यात आले, आणि त्यांना प्रत्येकी दोन लाख रुपये देण्याचे आश्वासन होते. मात्र आजपर्यंत त्यांना एक रुपयाही मिळालेला नाही. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ सांख्यिकी भर म्हणून उपयोगी ठरत नाही.

याच पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांनी या निर्णयाचे स्वागत करत ट्विटरवर प्रतिक्रिया नोंदवली. त्यांनी लिहिले, दलित, आदिवासी आणि मागास समाज गेल्या अनेक दशकांपासून या निर्णयाची वाट पाहत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ही गरज ओळखून हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मौर्य यांनी अप्रत्यक्षपणे विरोधकांवर टीका करत म्हटले की, ज्या पक्षांनी जातीय जनगणनेच्या नावाने सतत राजकारण केले, ते सत्तेत असताना मात्र या मुद्द्यावर गप्प राहिले. आज मात्र मोदी सरकारने त्या पोकळ आश्वासनांना वास्तवात उतरवले आहे.

काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते जयराम रमेश यांनीसुद्धा या मुद्द्यावर प्रतिक्रिया देत, ९ एप्रिल २०२५ रोजी अहमदाबाद येथे झालेल्या काँग्रेस परिषदेतील ठरावाची आठवण करून दिली. त्यांनी ट्विट करत म्हटले, कधीही न होण्यापेक्षा उशिरा बरे' काँग्रेसने यापूर्वीच सामाजिक न्यायासाठी ठराव मंजूर केला होता.

दरम्यान, बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी या निर्णयाला विरोधकांच्या विजयाची नोंद म्हणून संबोधले. पूर्वी मोदी सरकारने संसदेत जातीय जनगणनेला स्पष्ट विरोध केला होता. आता मात्र आमच्या अजेंडावर सरकार चालत आहे. ही आमची मागणी होती, आणि त्यामुळे हा आमचा विजय आहे, असे तेजस्वी म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, जनगणनेचे निकाल आले की आमची मागणी असेल की विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये मागास व अत्यंत मागासवर्गीयांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणानुसार जागा राखीव ठेवण्यात याव्यात. हेच आमचे पुढील आंदोलन असेल. याआधी, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी अधिकृतपणे जाहीर केले की, पुढील राष्ट्रीय जनगणनेच्या दरम्यान केंद्र सरकार जातीनिहाय माहिती संकलित करणार आहे.